कलम-१९

# अधिसूचना

**जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय, जिल्हा यवतमाळ**

**क्रमांक -प्र.अ./भुस./कली./कावि/८०१ /२०१८ दिनांक :-०७/०९/२०१८**

**(भूमीसंपादन, पनुर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

भू.सं.प्र.क्रं.११/४७/२०१३-१४ मौजा-कोहळ ता.नेर जि.यवतमाळ

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी भूमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , २०१३ (२०१३ चा ३०) यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक भू.सं/कावी/१०६२/२०१७ दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची,अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल ,कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून, उक्त अधिनिमाच्या कलम **१९ च्या पोट कलम (१) च्या** तरतुदीमध्ये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनूसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून,पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनिमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिका-याची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी दारव्हा जि.यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

गाव- कोहळ तालुका - **नेर** जिल्हा - **यवतमाळ**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २६१ | ०.२३ |
| २ | २६२ | ०.०२ |
| **एकूण** | | **०.२५** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** :- कोहळ लघु पाटबंधारे योजनचा

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- कोहळ लघु पाटबंधारे योजनचे कामाकरीता

**समाजाला मिळणारे लाभ** :- या प्रकल्पाव्दारे जमीनीस सिंचनाचा लाभ होतो.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

**अनुसूची - चार**

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश )**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.

Scanned by CamScanner

दिनांक १३ मार्च २०१५ चे राजपत्रात प्रसिध्द महाराष्ट्र शासनाची अधिसूचना क्रमांक संकिर्ण ०१/२०१५/प्र.क्र.३/अ-२, नुसार उक्त अधिनियमाचे कलम १०क नुसार सामाजिक प्रभाव निर्धारणाच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही. |
| (ब) | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :- निरंक |
| (क) | ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील | :- निरंक. |

**टिप :-** उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन दारव्हा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- ०७/०९/२०१८

ठिकाण :- यवतमाळ

जयंत देशपांडे
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी दारव्हा

डॉ.राजेश देशमुख
जिल्हाधिकारी, यवतमाळ

Scanned by CamScanner